**प्रेसनोट दिनांक १५/०८/२०१९**

# विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## गु.रजि नंबर ८७/२०१८,भादवि कलम ४२०,४६७,४६८,४६९,४७१,३४ या दाखल गुन्हयात ३ आरोपीस अटक केली

दिनांक २१/०३/२०१८ रोजी इसम नामे महेश मनोहर सोनोनी वय ४३ वर्षे रा.५०१ बी ३, शिवरंजन टॉवर्स सोमेश्वरवाडी पाषाण पुणे यांनी फिर्याद दिलेत मजकुर की, यातील आरोपी नामे पारस सुधिर शहा वय ३८ वर्षे रा. ए/ १ जयश्री अपार्टमेंट सावित्रीनगर हिंगणे खु्र्द सिंहगड रोड, पुणे. याने सर्व्हे नंबर २६९ हिस्सा नंबर ०१, सिटी सर्व्हे नं. ४४६६ चिंचवड पुणे येथील रो हाऊस या मिळकतीचे मालक नामे विजय पांडुरंग नवाधे,गिरीश ललीतकुमार लुनावत यांचे जागे दुसरे लोक उभे करुन त्यांच्या खोटया सहया करुन स्वतःचे नावे बोगस खरेदीखत करुन ते सह दुंय्यम निबंधक कार्यालयामध्ये रजिस्टर करुन घेवुन ते फिर्यादी यांचे इंडोस्टार फायनान्स कंपनी लिमी. विमाननगर शाखेत कर्ज प्रकरणामध्ये देवुन १,४२,५०,०००/- रुपये(एक कोटी बेचाळीस लाख पन्नास हजर) कर्ज घेवुन फिर्यादी यांचे इंडोस्टार फायनान्स कंपनी लिमी.कंपनीची फसवणुक केलेली आहे. वगैर मजकुराची तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा गुन्हा रजि नंबर ८७/२०१८, भादवि कलम ४२०,४६७,४६८,४६९,४७१,३४ गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. दाखल गुन्हयाचा तपास सहा पोलीस निरीक्षक श्री एम. आर. खोकले हे करीत होते. त्यांनी आरोपी नामे १. पारस सुधिर शहा वय ३८ वर्षे रा. ए/ १ जयश्री अपार्टमेंट सावित्रीनगर हिंगणे खु्र्द सिंहगड रोड, पुणे.यास दिनांक २१/०३/२०१८ रोजी २३/४५ वाजता अटक करुन त्याची दाखल गुन्हयाचे तपासकामी मा. न्यायालयातुन पोलीस कस्टडीचे रिमांड घेवुन आरोपीकडे गुन्हयाचा तपास करुन त्यास मदत करणारे आणखिन साथीदारांबाबत तपास केला परंतु आरोपीने गुन्हयाचे अनुशंगाने काहीही उपयुक्त माहीती दिलेली नाही.

सहा पोलीस निरीक्षक एम. आर. खोकले यांनी गुन्हयाचे अनुशंगाने गुन्हयातील फिर्यादी यांचे बँकेने मंजुर केलेले कर्ज रक्कमेतील पैसे कोणाचे खात्यामध्ये ट्रान्सफर झालेली आहे, गुन्हयातील आरोपीने आणखिन कोणकोणत्या बँकेकडुन अशा प्रकारे कर्ज घेतलेले आहे काय?याची माहीती काढुन सदरचे कर्जासाठी कोणकोणते खोटे व बनावट कागदपत्रे तयार केले आहेत याची माहीती घेवुन व त्याकामी आरोपीला सदरचे कर्जप्रकरणात बनावट व खोटे दस्त तयार करतांना आणखिन कोणकोणत्या साथीदारांनी मदत केली आहे याची माहीती काढुन व त्यांचे राहण्याचे ठिकाणांची माहीती काढुन पोलीस हवा. ४२६१ अविनाश शेवाळे, पोलीस नाईक ६४०७ राहुल मोरे, पोलीस हवा. ४६६४ मोहन काळे, यांचे मदतीने दिनांक ०१/०८/२०१९ रोजी आरोपी नामे १. भास्कर पंजाबराव कळसकर वय ५५ वर्षे रा. साठे कॉलनी चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, पुणे.२. हेमंत प्रभाकर गाडगिळ वय ४९ वर्षे रा. श्रीकृष्ण बिल्डींग, शास्त्रीनगर ज्ञानराज शाळेसमोर कासारवाडी पुणे. ३. प्रल्हाद प्रकाश चार्य वय ४५ वर्षे रा. ओमकार मित्र मंडळ, चौकाजवळ, साईलिला मंदीराचे समोर फुगेवाडी पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांना विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे आणुन त्यांचेकडे गुन्हयाचा तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना २१/१५ वाजता दाखल गुन्हयामध्ये अटक करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास सहा पोलीस निरीक्षक श्रीएम. आर. खोकले विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहे.

(राजेंद्र पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर